**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सय्यद फारूक महंमद इनामदार
१०९-ड-३, सिध्देश्वर पेठ, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष/सचिव,
सोलापूर सोशल असोसिएशन, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक सोलापूर सोशल उर्दू
हायस्कूल, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८७३ / सोलापूर / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.६.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सय्यद फारूक महंमद इनामदार
१०९-ड-३, सिध्देश्वर पेठ, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष/सचिव,
सोलापूर सोशल असोसिएशन, जि.सोलापूर श्री.ईस्माईल हा.अ.सत्तार जमादार

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक सोलापूर सोशल उर्दू
हायस्कूल, सोलापूर श्री.अ.जब्बार अब्दुल्ला शेख

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८.२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२.५.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २.६.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २१.८.२००७ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.८.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.३०.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सोलापूर सोशल असोसिएशन या संस्थेच्या संदर्भातील व संस्थेच्या शाळेबाबतची माहिती आपल्याला दिली जात नाही. संस्थेचे सभागृह लग्नासाठी भाड्याने दिले जाते, त्याची पावती दिली जात नाही, कायदेशीर काम केले जात नाही व नऊ कोटी वीस लाख रूपयांचा भ्रष्टाचार केला आहे, असे निवेदन अपीलकर्ता श्री.सय्यद फारूक महंमद इनामदार यांनी केले.

श्री.इनामदार यांनी वीस वर्षांच्या काळातील संस्थेची माहिती उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे मागितली होती. त्यांचा अर्ज शाळेकडे पाठविला. त्यानंतर शाळेकडील माहिती त्वरित देण्यात आली. अन्य मुद्दे संस्थेशी संबंधित असल्यामुळे संस्थेकडून माहिती घेण्याबाबत कळविले. तसा अर्ज न करता त्यांनी अपील केले. संस्थेकडील माहिती अपिलाच्या वेळी देण्यात आली. अपीलकर्ता विविध स्वरूपाचा पत्रव्यवहार व माहिती मागणारे अनेक अर्ज सातत्याने करीत असतात, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सोलापूर सोशल उर्दू हायस्कूल, सोलापूर श्री.अ.जब्बार अब्दुल्ला शेख व अपिलीय प्राधिकारी तथा सचिव/अध्यक्ष, सोलापूर सोशल असोसिएशन, जि.सोलापूर श्री.ईस्माईल अ.सत्तार जमादार यांनी केले. श्री.इनामदार यांनी उल्लेख केलेले सभागृह नसून पार्किंगची जागा आहे व त्याचे भाडे आकारले जात नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

संस्थेच्या कारभाराविषयीच्या अपीलकर्त्याच्या तक्रारी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयार्थ येत नाहीत. अन्य माहिती देण्यात आली आहे. अपीलकर्त्याने नेमकेपणाने व उचित माहिती जन माहिती अधिकाऱ्यांकडे मागणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१७.३.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. शशिकांत गणपतराव पारेख
कौस्तुभ, प्लॉट नं.६, फॉरेस्ट कॉलनी, अपीलकर्ता
आदर्शनगर, गोडोली (एमआयडीसी), सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अव्वल कारकून,
भू-संपादन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८८२ / २००९ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | २०.११.२००९ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. शशिकांत गणपतराव पारेख
कौस्तुभ, प्लॉट नं.६, फॉरेस्ट कॉलनी,
आदर्शनगर, गोडोली (एमआयडीसी), सातारा

**जन माहिती अधिकारी** तथा अव्वल कारकून,
भू-संपादन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा श्री. आर. ए. मिर्झा

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १५.१२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ९.१.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २.३.२००९ |

७ माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

सरकारी शेती शाळेसाठी सन १९४५ मध्ये सरकारने संपादित केलेल्या जमिनीच्या अनुषंगाने आपण मागितलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. जिल्हयातील सर्व १९ विशेष भूमी संपादन अधिकाऱ्यांना जिल्हाधिकारी कार्यालय, भूसंपादन शाखेतर्फे कळविण्यात आले. परंतु माहिती त्यांच्याकडून नव्हे, तर जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मिळू शकते, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. शशिकांत गणपतदास पारेख यांनी केले.

अपीलकर्ता श्री. पारेख वारंवार या विषयाबाबत माहिती मागणी व अन्य स्वरूपाचा पत्र व्यवहार करीत आले आहेत. सन १९४५ ते १९४८ या काळातील ही माहिती असून संपूर्ण अभिलेखाची तपासणी केली असता ती आढळून येत नाही, त्यामुळे विशेष भूमी संपादन अधिकाऱ्यांच्या कार्यालयातून माहिती प्राप्त करून घेण्याबाबत त्यांना व संबंधित कार्यालयांना कळविले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, भूसंपादन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा श्री. आर. ए. मिर्झा यांनी केले.

अपीलकर्त्याने यापूर्वीही या संदर्भात माहिती-मागणीचे व आयोगाकडे अपिले केली असून या अनुषंगाने अपील क्र. ७७३/२००९ मध्ये आयोगाने निर्णय दिला आहे. एकाच स्वरूपाचे अर्ज वारंवार व विविध स्वरूपाचे अर्ज करून अपीलकर्त्याने सर्व यंत्रणांचा वेळ व कार्यशक्ती याच्यांवर ताण टाकणे योग्य नाही. संबंधित कार्यालयांमध्ये अपीलकर्त्यास सर्व अभिलेख अवलोकनसाठी उपलब्ध करून द्यावेत व त्यातील आवश्यक त्या प्रती योग्य ते शुल्क आकारुन त्यांना द्याव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३१.३.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. जस्प्रीत उमाकांत बैरूणगी
१०३७७/२७, मुस्लीम पाच्छा पेठ,
सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** पोलीस उपआयुक्त (परिमंडळ),
सोलापूर शहर, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** सहायक पोलीस आयुक्त,
विभाग क्रमांक १ सोलापूर शहर, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९०४/ सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४.०८.२००७ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२.०८.२००७ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४.०९.२००७ |
| | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.०२.११.२००७ |
| ४ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -** सौ. कमल उमाकांत बैरूणगी यांची फिर्याद नोंद करून घेऊन (ॲट्रासिटी ॲक्टप्रमाणे) कायदेशीर कारवाई होणेबाबत | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दि. ८.१०.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपिल निर्गत कार्यक्रमा'मध्ये या अपिलाचा समावेश होता.

अपीलीय प्राधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (परिमंडळ), सोलापूर शहर यांनी दि. २/११/२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेली माहिती योग्य आहे तसेच अभिप्राय, कार्यवाही, भाष्य या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कार्यकक्षेत येत नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 29 MAR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. आनंद सायबू क्षिरसागर
भारती विद्यापीठासमोर, सुशीलनगर
घर नं. ६७, विजापूर रोड, सोलापूर **अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी ,**
शिक्षणधिकारी (माध्य.),
जिल्हा परिषद, सोलापूर **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी**
उपशिक्षणाधिकारी (माध्य.),
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९२१/ सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.११.२००७ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०१.०१.२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ०६.०२.२००८ |
| ५ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -</u>** सोलापूर शहर आणि जिल्हयातील इयत्ता ८ वी ते १० वी पर्यतच्या ज्या प्रशालांना सन २००१ साली ६०% अनुदान आपल्या कार्यालयाकडून दिले आहे. त्या प्रशालेंचे वार्षिक तपासणी अहवाल, यादी व प्रशालेतील कर्मचाऱ्यांच्या मान्यतेसाठी मुख्याध्यापकांनी आपल्या कार्यालयाकडे संपूर्ण कागदपत्रांसह पाठविलेला प्रस्ताव, आपल्या कार्यालयाकडून त्या प्रशालेस दिलेल्या मान्यतेच्या प्रती व आपल्या कार्यालयाकडून किती प्रशालांना ६६% अनुदान दिले आहे त्याची यादी इ. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ८.१०.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

यापूर्वीचे अपील क्रमांक ५१५/ सोलापूर व अपील क्रमांक ९२१/ सोलापूर या अपिलांमधील माहितीची मागणी समान असून अपील क्रमांक ५१५/सोलापूरचे आदेश पारित करण्यात आले आहेत. संबधित अभिलेख पाच वर्षापूर्वीचे असून निर्लेखित करावयाचे अभिलेख पावसाने खराब झालेले आहेत, असा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, यांनी दि. २९/०१/२०१० च्या पत्रान्वये आयोगास सादर केला आहे. अपील क्र. ५१५/ सोलापूर मध्ये जन माहिती अधिकारी यांचेवर माहितीबाबत दंडात्मक कारवाई आयोगाने केली असून तीच माहिती पुन:पुन्हा मागण्याची अपीलकर्त्याची कृती योग्य नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.** 29 MAR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.पंढरीनाथ कोंडिबा आडागळे
होलेवाडी, पो.राजगुरूनगर, ता.खेड — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, खेड, ता.खेड, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत होलेवाडी, पो.राजगुरूनगर, ता.खेड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९३०+११४५ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.२.२०१० |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत होलेवाडी, पो.राजगुरूनगर, ता.खेड, जि.पुणे श्रीमती प्रतिभा हरिभाऊ डोंगरे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११.७.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १.८.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२९.१.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२३.२.२००७ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२७.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.१७.२.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली.

होलेवाडी ग्रामपंचायतीने सन २००३ मध्ये बंधाऱ्याच्या कामाबाबत खोटे अहवाल सादर केले. मजुरांच्या हजेरीपत्रकाची प्रत व विस्तार अधिकाऱ्यांनी दि.१३.१.२००६ रोजी मजूराचे जाबजबाब घेतले त्याच्या नकला यांची मागणी आपण केली होती. परंतु जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत होलेवाडी, पो.राजगुरूनगर, ता.खेड जि.पुणे यांनी माहिती दिली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा विसतार अधिकारी, पंचायत समिती खेड, पो.राजगुरूनगर, ता.खेड जि.पुणे यांनी अपिलाची दखल घेतली नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे व जिल्हा भ्रष्टाचार निर्मूलन समिती, पुणे यांना ग्रामपंचायतीने सादर केलेल्या बनावट अहवालांची चौकशी व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.पंढरीनाथ कोंडिबा आडागळे यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात व लेखी निवेदनात केली आहे.

श्री.आडागळे यांनी यापूर्वीही याच संदर्भात विविध पातळयांवर अनेक अर्ज केले होते व त्या त्या वेळी त्यांना उत्तरे देण्यात आली आहेत. मजुरांचे हजेरीपत्रक व जबाबांच्या प्रती यांची मागणी त्यांनी पूर्वीही केली होती व या प्रती दि.२२.१२.२००६ रोजी त्यांना देण्यात आल्या असून ‘आपले समाधान झाले असून कोणतीही तक्रार राहिलेली नाही,’ असे त्यांनी लेखी दिले आहे व नंतर त्याच माहिती मागणीसाठी पुन्हा अर्ज व अपिले केली आहेत. ही माहिती समक्ष देऊ केली असता त्यांनी घेण्यास नकार दिला, म्हणून टपालाने पाठविली. ते टपाल त्यांनी स्वीकारले नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत होलेवाडी, पो.राजगुरूनगर, ता.खेड जि.पुणे श्रीमती प्रतिभा हरिभाऊ डोंगरे यांनी केले. श्री.आडागळे यांची स्वाक्षरी असल्याच्या दि.२२.१२.२००६ च्या पत्राची प्रत] अनुषंगिक पत्रव्यवहार व अन्य कागदपत्रे, तसेच पाठविलेल्या माहितीचे परत आलेले पाकिट, पुरविलेल्या माहितीच्या प्रतीसह त्यांनी सादर केले.

संबंधित माती-नाला बंधाऱ्याच्या कामाची, मजुरांच्या हजेरीपत्रकाची, त्यावरील धान्यवाटप आदी बाबींची सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी श्री.आडागळे यांनी दि.५.१२.२२००९ च्या लेखी निवेदनाद्वारे आयोगाकडे केली आहे. ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

## आदेश

अपिले अमान्य करण्यात येत आहेत .

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २२.३.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.विठ्ठल बाळकृष्ण पांढरे
मु.पो.शंकरगाव, ता.पंढरपूर, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी,
उपविभागीय कार्यालय, पंढरपूर, जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अव्वल कारकून,
उपविभागीय कार्यालय, पंढरपूर, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९३३ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३१.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विठ्ठल बाळकृष्ण पांढरे
मु.पो.शंकरगाव, ता.पंढरपूर, जि.सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा अव्वल कारकून,
उपविभागीय कार्यालय, पंढरपूर, जि.सोलापूर श्री.आर.व्ही.कुलकर्णी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.११.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २२.५.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५.१.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.७.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.३१.३.२०१० रोजी घेण्यात आली.

आपल्या मागणीप्रमाणे महादेव कोळी अनुसूचित जमातीचा दाखला आपल्याला दिला नाही व त्याबाबतची आपण मागितलेली माहितीही दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.विठ्ठल बाळकृष्ण पांढरे यांनी केली.

श्री.पांढरे यांच्या मागणीनुसार जातीचा दाखला दिला गेला नाही. त्याबाबत उच्च न्यायालयात त्यांनी केलेला दावा उच्च न्यायालयाने निर्णयासाठी शासनाकडे परत पाठविला आहे. उपविभागीय अधिकारी, पंढरपूर विभाग, पंढरपूर, ता.पंढरपूर, जि.सोलापूर यांनी त्यांचा दावा फेटाळला. त्या अनुषंगाने सर्व कागदपत्रांच्या, शासन निर्णयाच्या प्रती त्यांना देण्यात आल्या. परंतु निर्णयाच्या अनुषंगाने खुलासे, स्पष्टीकरण इत्यादीची मागणी ते करीत आहेत. जाती दाखल्याबाबतच्या निर्णयाविषयी असे स्पष्टीकरण माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत देता येणार नाही. आवश्यक वाटल्यास ते जात पडताळणी समितीकडे अपील करू शकतात, हे त्यांना वेळोवेळी स्पष्ट करण्यात आले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, उपविभागीय कार्यालय, पंढरपूर, जि.सोलापूर श्री.आर.व्ही.कुलकर्णी यांनी केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी माहिती-मागणीच्या अर्जाबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. 31 MAR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

(१)सौ.नंदा जयवंत गावंधरे (अ.क्र.९३९ / ९४० / ९४१)
(२)श्री.तानाजी शिवाजी गावंधरे (अ.क्र.९३६ / ९३७ / ९३८)
क्र.१ व २ रा.मु.पो.भोसे, ता.पंढरपूर, जि.सोलापूर — अपीलकर्ता
(३)श्री.किसन निवृत्ती निंबे (अपील क्र.९४२/९४३/९४५/९४६)
श्री पांडुरंग सहकारी साखर कारखाना लि.श्रीपूर,
ता.माळशिरस, जि.सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर),
पुणे विभाग, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक, श्री पांडुरंग सहकारी
साखर कारखाना लि., श्रीपूर, ता.माळशिरस, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९३६ ते ९४३+ ९४५+९४६ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३१.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** (१)सौ.नंदा जयवंत गावंधरे (अ.क्र.९३९ / ९४० / ९४१)
(२)श्री.तानाजी शिवाजी गावंधरे (अ.क्र.९३६ / ९३७ / ९३८)
क्र.१ व २ रा.मु.पो.भोसे, ता.पंढरपूर, जि.सोलापूर
(३)श्री.किसन निवृत्ती निंबे (अपील क्र.९४२/९४३/९४५/९४६)
श्री पांडुरंग सहकारी साखर कारखाना लि.श्रीपूर, ता.माळशिरस, जि.सोलापूर
**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर),
पुणे विभाग, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे श्री.डी.आर.घोडे

| **जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक, श्री पांडुरंग सहकारी साखर कारखाना लि., श्रीपूर, ता.माळशिरस, जि.सोलापूर प्रतिनिधी श्री.पी.एस.पाठक | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील क्रमांक | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख |
| ९३९ | ११.२.२००८ | उत्तर दिलेले नाही. | १७.३.२००८ | १५.४.२००८ |
| ९४० | ११.२.२००८ | | १७.३.२००८ | १५.४.२००८ |
| ९४१ | ११.२.२००८ | | १७.३.२००८ | १५.४.२००८ |
| ९३६ | ११.२.२००८ | | १७.३.२००८ | १५.४.२००८ |
| ९३७ | ११.२.२००८ | | १७.३.२००८ | १५.४.२००८ |
| ९३८ | ११.२.२००८ | | १७.३.२००८ | १५.४.२००८ |
| ९४२ | ११.२.२००८ | | १७.३.२००८ | १५.४.२००८ |
| ९४३ | ११.२.२००८ | | १७.३.२००८ | १५.४.२००८ |
| ९४५ | ११.२.२००८ | | १७.३.२००८ | १५.४.२००८ |
| ९४६ | ११.२.२००८ | | १७.३.२००८ | १५.४.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | | | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.७.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त अपील क्र.९३६ ते ९४१ या अपिलांचा समावेश होता. त्यावेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी उपस्थित नसल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.३१.३.२०१० रोजी घेण्यात आली.

अपीलकर्त्या सौ.नंदा जयवंत गावंधरे (अपील क्र.९३९ / ९४० / ९४१) व श्री.तानाजी शिवाजी गावंधरे (अ.क्र.९३६ / ९३७ / ९३८) यांनी श्री पांडुरंग सहकारी साखर कारखाना लि., श्रीपूर, ता.माळशिरस, जि.सोलापूर या साखर कारखान्याकडे माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, श्री पांडुरंग सहकारी साखर कारखाना लि.श्रीपूर, ता.माळशिरस, जि.सोलापूर यानी अर्ज व रजिस्टर टपालही स्वीकारले नाही. तसेच त्यांच्याकडून माहिती मिळाली नाही, म्हणून अपीलकर्त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक

(साखर) पुणे विभाग, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी तीनवेळा कळवूनही जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती दिली नाही. थोडीफार माहिती दिली, तीही विलंबाने दिली. त्यामुळे अपीलकर्त्यास निःशुल्क माहिती देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर) पुणे विभाग, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांनी दिला. त्यानुसारही साखर कारखान्याने माहिती दिली नाही. अर्ज न स्वीकारणें, माहिती-मागणीचा अर्ज ग्राह्य न मानणे व माहिती न देणे याबद्दल जन माहिती अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्त्या सौ.नंदा जयवंत गावंधरे व श्री.तानाजी शिवाजी गावंधरे यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपिलांमध्ये केली आहे.

अपीलकर्त्यांनी सन १९९४-९५ ते २००६-२००७ या काळातील विस्तृत माहिती मागितली आहे. कारखान्याच्या सुमारे ५००० सभासदांची व्यक्तिगत व आर्थिक स्वरूपाची तपशीलवार माहिती अपीलकर्त्यांनी मागितली आहे. राजकीय विरोधातून जाणीवपूर्वक ब्लॅकमेलिंग करण्यासाठी अशा प्रकारची माहिती-मागणी व अर्ज अपीलकर्ते करीत आहेत. तसेच कारखान्याला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही. नियमानुसार माहितीच्या मागणीबाबत अपीलकर्त्यांनी पूर्तता केली नसताना अपिलीय प्राधिकाऱ्यानी अपीलकर्त्यांचे म्हणणे ग्राह्य मानले आहे. म्हणून अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर) पुणे विभाग, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांचा निर्णय रद्द करावा, अशी मागणी मूळ अर्जातील जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, श्री पांडुरंग सहकारी साखर कारखाना लि.श्रीपूर, ता.माळशिरस, जि.सोलापूर श्री.किसन निवृत्ती निंबे (अपील क्र.९४२ / ९४३ /९४५ / ९४६ ) यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपिलांमध्ये केली आहे.

अपीलकर्त्यांनी आयोगापुढील सुनावणीच्या वेळी अपील अर्जातील निवेदनाचा पुनरूच्चार केला.

मूळ अर्जातील जन माहिती अधिकारी व अपील क्र.९४२ / ९४३ /९४५ / ९४६ मधील अपीलकर्ता श्री.किसन निवृत्ती निंबे यांनी न्यायालयीन कारणमुळे उपस्थित राहता येत नसल्याचे

कळवून आपले प्रतिनिधी श्री.पी.एस.पाठक यांच्यामार्फत पुढील तारीख देण्याची विनंती करणारा अर्ज सादर केला.

अपीलकर्त्यांचे अर्ज जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, श्री पांडुरंग सहकारी साखर कारखाना लि., श्रीपूर, ता.माळशिरस, जि.सोलापूर यांनी स्वीकारले नाहीत, म्हणून अर्ज स्वीकारून आठ दिवसांत निःशुल्क माहिती द्यावी, असे आदेश आपण प्रथम अपिलाच्या निर्णयात दिले. मात्र हजारो सभासदांशी निगडित, तसेच व्यक्तिगत व आर्थिक स्वरूपाची माहिती मागितली आहे, याबाबतची तक्रार आपल्यापुढील सुनावणीत केली गेली नव्हती. मूळ अर्जानुसार हा तपशील तपासावा लागेल. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २(एच) मधील तरतुदीनुसार कारखाना 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नाही हा मुद्दा आपल्यापुढे उपस्थित झाला नव्हता. कारखान्याला मिळणारे शासकीय अनुदान, भाग भांडवल, इत्तर सवलती आदींबाबतचा तपशील त्यासाठी तपासावा लागेल, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), पुणे विभाग, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे श्री.डी.आर.घोडे यांनी केले.

उपरोक्त साखर कारखाना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५, कलम २(एच) अन्वये 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरतो याबाबतचे पुरावे मूळ अर्जदारांनी सादर केलेले नाहीत.

उभय बाजूंची निवेदने व अपिलीय प्राधिका-यांचे निवेदन लक्षात घेता ;

(अ) श्री पांडुरंग सहकारी साखर कारखाना लि., श्रीपूर, ता.माळशिरस, जि.सोलापूर साखर कारखाना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५, कलम २(एच) अन्वये 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरतो की नाही?

(ब) मूळ अर्जदारांनी मागितलेली माहिती त्रयस्थ पक्ष म्हणून हजारो सभासदांच्या व्यक्तिगत व आर्थिक हितसंबंधांशी निगडित आहे काय? जी जाहीर करण्यात सार्वजनिक हित अहे की नाही?

(क) साखर कारखान्याची साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागण्याएवढी विस्तृत स्वरूपातील माहिती मूळ अर्जदारांनी मागितली आहे काय?

हे मुद्दे अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर) पुणे विभाग, पुणे साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांनी तपासणे आवश्यक आहे.

(ड) अर्जदारांच्या म्हणण्याप्रमाणे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, श्री पांडुरंग सहकारी साखर कारखाना लि., श्रीपूर, ता.माळशिरस, जि.सोलापूर यांनी माहितीच्या अधिकारातील अर्ज स्वीकारले नाहीत, याबाबतचे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, श्री पांडुरंग सहकारी साखर कारखाना लि., श्रीपूर, ता.माळशिरस, जि.सोलापूर यांचे म्हणणे काय आहे, हे प्रथम अपिलातील निर्णयात स्पष्ट झालेले नाही. त्याची तपासणीही अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर) पुणे विभाग, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांनी करणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर) पुणे विभाग, पुणे साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांच्याकडे अपिले फेरविचारार्थ परत पाठविण्यात येत आहेत.

(२) वर नमूद केलेल्या अ,ब,क व ड या मुद्दयांबाबत उभय बाजूंचे म्हणणे विचारात घेऊन वस्तुस्थितीची तपासणी करून अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर) पुणे विभाग, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांनी दि.१५.४.२०१० पर्यंत निर्णय देऊन आयोगाला त्याची प्रत सादर करावी.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.३१.३.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. सूर्यकांत अण्णा बल्लाळ
न्यु डिझेल कॉलनी, आर बी.२ एच, रूम नं.३,
ताडीवाला रोड, पुणे

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर पोलिस अधीक्षक,
लोहमार्ग, पुणे विभाग, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप विभागीय पोलिस अधिकारी,
लोहमार्ग, पुणे विभाग, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९४/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | ९.४.२०१० |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. सूर्यकांत अण्णा बल्लाळ
न्यू डिझेल कॉलनी, आर बी.२ एच, रूम नं.३,
ताडीवाला रोड, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर पोलिस अधीक्षक,
लोहमार्ग, पुणे विभाग, पुणे तर्फे श्री. र. पां. अमिनकर

ए

**जन माहिती अधिकारी** तथा उप विभागीय पोलिस अधिकारी,
लोहमार्ग, पुणे विभाग, पुणे श्री. र. पां. अमिनकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९.६.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.६.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४.७.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १४.८.२००९ |

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

सन २००५ मध्ये आपण केलेल्या तक्रारीबाबत घेतलेले जाब-जबाब एकाच पध्दतीचे असून फसवणुकीचा हा प्रकार असल्यामुळे जबाब देणाऱ्याची ब्रेन मॅपिंग व नार्को चाचणी करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. सूर्यकांत अण्णा बल्लाळ यांनी केली.

त्यावेळच्या जाब-जबाबाच्या प्रती अभिलेखात आढळत नव्हत्या. संबंधित अधिकाऱ्याच्याकडून पाठपुरावा करून कागदपत्रे मिळविण्यात आली व त्याच्या प्रती अपीलकर्त्यास देण्यात आल्या, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, पुणे डॉ. दिगंबर पांडुरंग प्रधान यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्याने चाचणीविषयी केलेली मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 31 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रमेश संभाजीराव उमरगे
राजे शिवाजीनगर, स.नं.१६, टेल्को कंपनीमागे, इंडिया गेटसमोर,
साहिल सृष्टी, बंगला नं.६, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस महानिरीक्षक (आस्थापना),
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय, कुलाबा, मुंबई — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस महानिरीक्षक (आस्थापना),
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय, कुलाबा, मुंबई

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९४१ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रमेश संभाजीराव उमरगे
राजे शिवाजीनगर, स.नं.१६, टेल्को कंपनीमागे, इंडिया गेटसमोर,
साहिल सृष्टी, बंगला नं.६, पुणे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.६.१.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२७.१.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१३.२.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२८.३.२००७ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

पोलीस प्रशिक्षण केंद्रात कायदा पदवीधर पोलिसांना नियुक्त करणे अधिक उपयुक्त असतानाही केले जात नाही व बाहेरील व्यक्तींना ते काम दिले जाते. कंत्राटी पध्दतीच्या तीन व्यक्तींबाबत आपण प्रश्न उपस्थित केले आहेत. आपण कायदापदवीधर असून अशा अकरा उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलाविले, परंतु एकाचीही नियुक्ती केली नाही. आपण सन १९९९ मध्ये अर्ज केला असून कार्यालयीन अभिलेखावर तो उपलब्ध नसल्याचे उत्तर दिले जाते. विविध विभागांकडे याबाबत पत्रव्यवहार केला असता अन्याय निवारण होत नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.रमेश संभाजीराव उमरगे यांनी केली.

अपीलकर्त्याची तक्रार व मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत समाविष्ट होत नाही. तथापि, त्यांचा मूळ अर्ज कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध नसणे व विविध पातळ्यांवर त्यांना आवश्यक ती अनुषंगिक माहिती न दिली जाणे योग्य नाही. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस महानिरीक्षक(आस्थापना), पोलीस महासंचालक यांचे कार्यालय, कुलाबा, मुंबई यांनी त्यांना दिली पाहिजे.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस महानिरीक्षक(आस्थापना), पोलीस महासंचालक यांचे कार्यालय, कुलाबा, मुंबई व अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस

महानिरीक्षक(आस्थापना), पोलीस महासंचालक यांचे कार्यालय, कुलाबा, मुंबई सुनावणीला उपस्थित न राहिल्याबद्दल त्यांना समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) नेमकी माहितीची मागणी नमूद करून अपीलकर्ता श्री. श्री.रमेश संभाजीराव उमरगे यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस महानिरीक्षक(आस्थापना), पोलीस महासंचालक यांचे कार्यालय, कुलाबा, मुंबई यांना निवेदन द्यावे. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस महानिरीक्षक(आस्थापना), पोलीस महासंचालक यांचे कार्यालय, कुलाबा, मुंबई यांनी अर्ज प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांत अपीलकर्त्यास मुद्देनिहाय माहिती द्यावी व अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. यानुसार कार्यवाही न झाल्यास ते शास्तीस पात्र ठरतील.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. .३.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. म. सलीम नबीलाल नदाफ
१७१, गुरुवार पेठ,
सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा व्यवस्थापक,**
महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ,
सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास
महामंडळ, प्रशासकीय भवन, ४था मजला, आर.सी.चेंबूरकर मार्ग,
चेंबूर, मुंबई

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९५५/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३.०२.२००८ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १७.०३.२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.०३.२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८.०४.२००८ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** सोलापूर शहर, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, बार्शी, अक्कलकोट या तालुक्यातील मुदत कर्ज योजना, स्वार्णिमा योजना, स्वंयसक्षम योजना, महिला समृध्दी योजना, प्रशिक्षण योजना या मध्ये लाभ दिलेल्या लाभार्थीची नावे, पत्ता, कर्ज दिल्याची तारीख, कर्ज रक्कम, उद्योगाचे नाव इ. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ८.१०.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

आवश्यक माहिती मिळाल्याने पूर्ण समाधान झाल्याने तक्रार राहिली नसल्याचे अपिलकर्ता श्री. म.सलीम नबीलाल नदाफ यांनी प्रपत्रात नमूद केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 29 MAR 2010

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.शरणप्पा श्रीमंत चलगेरी
मु.पो.संगोगी (आ), ता.अक्कलकोट, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय, अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९९१ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३१.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय, अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर श्री.प्रशांत ढगे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर श्री.एम.एम.बिराजदार

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १९.१०.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९.१०.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २३.४.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१९.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.३१.३.२०१० रोजी घेण्यात आली. त्यावेळीही अपीलकर्ता गैरहजर होते.

अपीलकर्ता श्री.शरणप्पा श्रीमंत चलगेरी यांनी मागितलेली माहिती त्यांना देण्यात आली आहे. मात्र राज्य माहिती आयोगाकडे त्याबाबत आपल्या नावे दाखल झालेले अपील आपण केले नसल्याचे व या अपिलाशी आपला कोणताही संबंध नसल्याचे लेखी निवेदन श्री.चलगेरी यांनी दिले असल्याचे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर श्री.एम.एम.बिराजदार यांनी नमूद केले. श्री.चलगेरी यांच्या स्वाक्षरीचे हे पत्र त्यांनी सुनावणीच्या वेळी सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. 31 MAR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री अरूण अप्पाराव गुमटे
११११,आर कसबा, टिळक चौक,
सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा**
दुग्धशाळा व्यवस्थापक,
शासकीय दूध योजना, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा**
प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी ,
लक्ष्मी रोड, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९९८/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३१.३.२०१० |
| ३ | उपस्थित<br>**अपिलीस प्राधिकारी तथा** दुग्धशाळा व्यवस्थापक,<br>शासकीय दूध योजना, सोलापूर<br>श्री. एम एस. माळगे, प्रभारी अधिकारी<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी ,<br>लक्ष्मी रोड, पुणे<br>श्री. के. एस. गायकवाड | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४.४.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.४.२००८ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**<br><br>मूळ माहिती अर्ज (जोडपत्र 'अ ')ची छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. अरूण राजाराम गुमटे यांचे दि. २०.१२.२००८ रोजी निधन झाल्याचे जन माहिती अधिकारी तथा वरीष्ठ प्रशासकीय अधिकारी, दुग्धव्यवसाय विकास विभाग, पुणे यांनी सुनावणीच्यावेळी मृत्यू प्रमाणपत्राच्या प्रतीसह सादर केले.

आयोगाचे आदेश पुढील प्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 31 MAR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ